mA - 95/2026

जावक कमांक २४०८/२०२६
शिरोळ पोलीस ठाणे
दिनांक २९/०७/२०२६

**प्रति,**

**मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, कोर्ट जयसिंगपुर**

**यांना सविनय सादर**

प्रतिवेदक :- पोलीस निरीक्षक, शिरोळ पोलीस ठाणे यांजकडून

विषय -शिरोळ पो.ठाणे गु.र.नं २१६/२६ महा.पशु संरक्षण अधि.कलम ५(a)(१) वैगेरे प्रमाणे दाखल गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल बाबत म्हणणे सादर

संदर्भ :- मा.न्यायालयाकडील फौ.कि.अ. ९५/२०२६

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन सादर की, शिरोळ पो.ठाणे गु.र.नं २१६/२६ महा.पशु संरक्षण अधि.कलम ५(a)(१) वैगेरे प्रमाणे दाखल गुन्ह्याचे कामी एक बोलेरो पिकअप तिचा रजि.नंबर MH-०९-CU-५००१ असा असलेली जप्त आहे तसेच ४ मोठे खिलार बैल व एक खोंड असे एकुण पाच जनावरे जप्त असून यातील अर्जदार यांनी ती परत मिळणेकामी मा. न्यायालयात अर्ज केला असून सदर बाबत मा. न्यायालयाने तपासी अधिकारी यांचे म्हणणे मागितले असून आमचे म्हणणे असे की, यातील अर्जदार यांना सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल बोलेरो पिकअप व पाच जनावरे ही योग्य त्या अटी व शर्तीवर परत देणेस आमची काही एक हरकत नाही.म्हणुन रिपोर्ट सादर

मा.सविनय सादर

पोलीस निरीक्षक
शिरोळ पोलीस ठाणे

Cri.M.A.No.95/2026
Exh.11/C
Order-filed

P S BHOSALE
Digitally signed by P S BHOSALE
Date: 2026.07.29 17:24:18 +0530

नि.क्र.5/1 (13)

शामुको. वाय ५५-७५,०००-१०.२००७

Form : II A

# CRIME DETAILS FORM

## गुन्ह्याच्या तपशीलाचा नमुना / घटनास्थळ पंचनामा

१. State : महाराष्ट्र Dist : कोल्हापूर P.S. शिरोळ FIR/Proceedin/G.D.No. : 216 Year: 2026 Date: 19/6/2026
राज्य जिल्हा पोलीस ठाणे पहिली खबर क्र./कार्यवाही क्र. वर्ष तारीख

२. Act and Sections : महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम 1976चे कलम 5(A)(1), 5(A)(2), 5(B) प्राणी छळक प्रतिबंधक 11(1) D प्राणी वाहतुक 38(1) केंद्र मोटर वाहन 125(e)
अधिनियम व कलमे :

३. The Place of Occurrence shown by : प्रमाणे
घटनेचे ठिकाण दाखविण्याचे :
Name : अभिजीत विश्वनाथ घुमाळ पो.कॉ 301 शिरोळ Father's/Husband's Name : विश्वनाथ घुमाळ
नांव : पित्याचे / पतीचे नाव :
Address : शिरोळ पोलीस ठाणे
पत्ता :

४. TYPE OF CRIME (All including M.O.Crime):
गुन्ह्याचा प्रकार (गुन्ह्याच्या सर्व पध्दतीसह) :

(i) *Major Head : बिगर परवाना जनावरांची (ii) *Classification of Major Head:
प्रधान शीर्ष : प्रधान शीर्षचा विभाग :

(iii) *Method (s) : वाहतूक
पध्दती :
१. टेम्पो मधून दाटीवाटीने देशी गोवंश जातीची जनावरे
२. दाटीवाटीने भरून त्यांची चारा, पाण्याची सोई न करता
३. वाहतूक करून क्रुरतेची वागणूक दिलेने.

(iv) *Conveyances used : MH-09-CU-5001 बोलेरो पिकअप टेम्पो
वापरलेली वाहने :

(v) *Character assumed :
केलेले वेषांतर / केलेली बतावणी : —

(vi) *Language / Slang used : मराठी
वापरलेली भाषा :

(vii) *Special Feature - १ :
विशेष वैशिष्ट्ये - १ :
*Special Feature - २ :
विशेष वैशिष्ट्ये - २ :
*Special Feature - ३ :
विशेष वैशिष्ट्ये - ३ :

(viii) Type oa Place of Occurrence : नृसिंहवाडी गावचे हद्दीत शिरोळ ते नृसिंहवाडी जाणारे रोडवर हनुमान मंदिरचे पुढे अंदाजे 100मिटर अंतरावर ता. शिरोळ.
घटनेच्या ठिकाणाचा प्रकार :

(ix) Type of Property Involved (४ Types : Major head of the Property to be filled)
अंतर्भूत मालमत्तेचे प्रकार :
(१) ---------- (२) ----------
(३) ---------- (४) ----------

५. Particulars of the victims (Attach separate sheet, if required)
बळीचा तपशील (आवश्यक असल्यास स्वंतत्र कागद जोडावा)

| Sr. No. अ.क्र. | Full Name संपूर्ण नांव | Date/ Year Of Birth जन्मतारीख व वर्ष | Sex लिंग | Nationality राष्ट्रीयत्व | Religion धर्म | Whether SC/ST जाती/जमाती | Occupation व्यवसाय | Address पत्ता | Inuary: Grievous/ Simple दुखापत गंभीर/साधी | Means साधने/ हत्यारे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

पोलीस निरीक्षक विरार पोलीस ठाणे

६. Motive of Crime : ————
गुन्ह्याचा हेतू : ————

७. Details of properties Stolen /Involved : (Use appropriate prescribed forms (s) and attach) :
चोरीच्या / अंतभूत मालमत्तेचा तपशील (योग्य नमुना वापरावा व सोबत जोडावा ) :

— पंचनामा प्रमाणे

पो.ठा./२ (15)

From : II C

८. Description of the place of occurrence (Contd.) :
घटनेच्या जागेचे वर्णन :

आज रोजी आम्ही वरील नावे नमूद करून दिले पंचास आपण पोलीस अंमलदार एस. बी. वडगार श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक शिरोळ पोलीस ठाणे यांनी शिरोळ ते नृसिंहवाडी जाणारे रोडवर असलेले मारुती मंदिर जवळ बोलावून घेवून कळविले की इसम नामे प्रथमेश उदय मुळे रा. 1131 पेठभाग मारुती रोड, सांगली ता. मिरज जि. सांगली यांनी डायल 112 वर फोन करून सांगितले की मला तसेच श्री शिवछत्रपती आदर्श गोरक्षक समिती सांगली मधील अवधूत सुर्यकांत रणदिवे रा. 379 गावभाग पाटील गल्ली सांगली ओंकार संजय कांबळे मला कळविले की ते शिरोळ यांनी जनावरे घेवून जाणारी एक गाडी वरील समितीच्या लोकांनी शिरोळ ते नृसिंहवाडी जाणारे रोड हनुमान मंदिर जवळ रस्त्याचे कडेस अडवली आहे. सदर गाडीच्या जनावरांच्या दिसते परिस्थितीचा पंचनामा करावयाचा आहे. पंच म्हणून हजर राहणेस कळविले करून पंच म्हणून हजर राहून लिहून दिला पंचनामा खालील प्रमाणे

आम्ही पंचासमक्ष हजर असले पोलीस अंमलदार अमित विश्वनाथ सुमंत पो.कॉ. 30, पो.ना. 1278 विलास मिरजे, व एस बी वडगार श्रेणी पोसई असे शिरोळ ते नृसिंहवाडी जाणारे रोडवर हनुमान मंदिर जवळ असले रस्त्याचे कडेला एक बोलेरो पिकप कंपनीचा टेम्पो वाहन क्र. MH-09-CU 5001 या वाहनाचा आम्हास पंचासमक्ष पाहणी केली असता सदर वाहना मध्ये खिल्लारी जातीचे देशी गोवंश 04 मोठे बैल व 01 खोंड असे दाटीवाटीने बांधलेली दिसली म्हणून आम्ही सदर वाहनाचे गाडी चालकाकडे जनावरांबद्दल चौकशी केली असता त्याने त्याचे नाव लक्ष्मण जुगधर पवार वय वर्षे 35 रा. समडोळी ता. मिरज जि. सांगली असे असलेचे सांगितले व सदरची जनावरे महादेव सिद्धाप्पा वडर रा. केरूर ता. चिक्कोडी जि. बेळगाव राज्य कर्नाटक येथे सोडण्यासाठी मला भाडे देऊन समडोळी येथून भरून केरूर ता. चिक्कोडी जि. बेळगाव येथे सोडण्यास सांगितले आहे. असलेली एकुण 05 खिल्लार जातीचे गोवंश त्यामध्ये 04 मोठे बैल व 01 खोंड अशी जनावरे बोलेरो पिकअप टेम्पो वाहन क्रमांक MH 09-CU-5001 मध्ये अत्यंत क्रुरतेने व दाटीवाटीने होती त्यास चारा पाणी याची व्यवस्था न करता दाटीवाटीने बांधलेली होती त्याचेकडे आम्ही पशुवाहतुकीचा परवाना आहे काय असे विचारले असता त्यांनी नाही असे सांगितले. सदर बोलेरो पिकअप वाहन व खालील जनावरे आगीच जप्त करणेत आली असुन त्याचे वर्णन खालील प्रमाणे

1) 20,000/- रूपये त्यात एक खिल्लार जातीचा गोवंश बैल एक तांबुस रंगाचा अंदाजे 04 वर्षे वयाचा मिळून कि.अ.

2) 20,000/- त्यात एक खिल्लार जातीचा गोवंश बैल एक

पोलीस निरीक्षक शिरोळ पोलीस ठाणे

From : II C

८. Description of the place of occurrence (Contd.) :
घटनेच्या जागेचे वर्णन :

पांढऱ्या रंगाच्या अंदाजे 3.5 वर्षे वयाचा मिळून कि.सं.
3) 20,000/- रुपयेचा त्यात एक खिलार जातीचा गोवंश, बैल
एक पांढऱ्या रंगाचा अंदाजे 03 वर्षे वयाचा मिळून कि.सं.
4) 20,000/- रुपये त्यात एक खिलार जातीचा गोवंश बैल -
एक पांढऱ्या रंगाच्या अंदाजे 2.5 वर्ष वयाचा मिळून कि.सं.
5) 10,000/- रुपये त्यात एक खिलार जातीचा गोवंश खोंड एक
पांढऱ्या रंगाच्या अंदाजे 1.5 वर्ष वयाच्या मिळून कि.सं.
6) 3,00,000/- रुपये त्यात एक बोलेरो पिकअप कंपनीचा
टेम्पो वाहन क्र. MH-09-CU-5001 जु.वा.कि.सं.
एकूण 390,000/- रुपये.

येणेप्रमाणे वरील वर्णनाचा टेम्पो व त्यामधील जनावरे दोन पंचासमक्ष पंचनामा करून आमचे श्री. पोसई बंडगर यांनी ताब्यात घेतले आहे.

सदरचे वाहन मिळून आले ठिकाणाची चतुःसीमा पाहता पूर्वेकडील बाजूस एकवडे शिवाजीराव माने देशमुख यांचा पेट्रोल पंप आहे. पश्चिमेकडील बाजूस शिरोळ ते नृसिंहवाडी कडे जाणार डांबरी रोड व त्या पलीकडे संभाजी वसंत देशमुख यांचे राहते घर व जमीन आहे. दक्षिणेकडील बाजूस नृसिंहवाडीकडे जाणारा डांबरी रोड आहे. व उत्तरेकडील बाजूस शिरोळकडे जाणार डांबरी रोड व त्याच्या पलीकडे तिरकस शिरोळ कडील बाजूस अंदाजे 100 मिटर अंतरावर हनुमान मंदिर आहे. अशा चतुःसीमा सदरचे जनावरांचे वाहन मिळून आलेले ठिकाण आहे.

सदर ठिकाणाचा अक्षांश 16.71220 व रेखांश 74.60465 असा आहे.

पंचनामा पंचांचे समक्ष पंचांचे उपस्थितीत दिसले परिस्थिती लिहिलेला बरोबर आहे.

पंचनामा 15.15 वाजता सुरुवात करून 16.15 वाजता लिहून पुरा केला आहे.


हा लिहून दिला पंचनामा समाप्त.

शिरोळ पोलीस ठाणे
भाग५/भाग६/प्रोव्ही
मु.र.नं. 154/2026
पोलीस कारकून
शिरोळ पोलीस ठाणे

पोलीस निरीक्षक शिरोळ पोलीस ठाणे

From : II D

९. नकाशा / Map :




१०. Description of physical evidence from the scence of crime for the property recovered / seized for the purpose of investigation :
तपासकामी प्रत्यक्ष पुरावा म्हणून गुन्ह्याच्या जागेवरुन मिळविलेल्या / जप्त केलेल्या मालमत्तेचे वर्णन :
पंचनामे प्रमाणे.

११. Date and Time of Panchanama 19/6/2026 Time 15.15 ते 16.15 पर्यंत
घडनास्थळ पंचनाम्याची वेळ दिनांक वेळ

१२. Name of Panchas
पंचांची नोवे :

Signature of panchas
पंचांच्या सह्या :

(१) विशाल चंद्रकांत कांबळे व.व. 24
Full Address पत्ता : धंदा मजुरी मो.नं. 9850351689. रा. आगरभाग ता. शिरोळ जि. कोल्हापूर

(२) अमोल अनिल कांबळे व.व. 37
Full Address पत्ता : 9356451805 रा. रमाबाई हौसिंग सोसायटी शिरोळ जि. कोल्हापूर

Name and Signature of Investigation Officer
तपासी अंमलदाराची सही

Date : 19/06/2026
दिनांक :

Name : एस. बी. खंडार
नाव :

Rank : ग्रेड पोसई B.No. if any : शिरोळ
पदनांम : पोलीस ठाणे

अमित विश्वनाथ धुमाळ
पो.कॉ. ३०१ शिरोळ

पो.ठा.15

जावक क्रमांक 2327/2026

शिरोळ पोलीस ठाणे
दिनांक 19/06/2026

(37)

प्रति,

मा.अधिकारी सो।,
गोविज्ञान व संवर्धन संस्था संचलीत वेद खिलार गोशाळा
निमशिरगाव ता.शिरोळ

यांना सविनय सादर

प्रतिवेदक – एस.बी.बंडगर श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ,शिरोळ पोलीस ठाणे
यांजकडून वि.पु.की,

विषय – खिलार जातीचे गोवंश देशी 04 मोठे बैल व 01 खोंड अशी एकुण 05 जनावरे आपलेकडील गोशाळेत जमा करुन घेणेबाबत....

महोदय,

शिरोळ पोलीस ठाणे गु.र.नं 216/2026 महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमक कलम 5अ(1), 5अ(2),5(ब), 9 सह प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम कलम 11(1)(ड),प्राण्यांचे परिवहन अधिनियम कलम 38(1), केंद्रीय मोटर परिवहन अधिनियम कलम 125(इ) प्रमाणे दाखल असुन सदर गुन्ह्यातील फिर्यादी अमित विश्वनाथ धुमाळ पो.कॉ 301 नेमणुक – शिरोळ पोलीस ठाणे यांनी फिर्याद दिली की, टेम्पो क्रमांक MH 09 CU 5001 मध्ये गाडीचालक लक्ष्मण झुंजर परीट व.व.35 राहणार समडोळ ता.मिरज जि.सांगली यांनी गायवर्गीय खिलार जातीची देशी 04 मोठे बैल व 01 खोंड अशी एकुण 05 जनावरे दाटीवाटीने भरुन त्यांची चारापाण्याची सोय न करता , कत्तल करण्याच्या उद्देशाने वरील क्रमांकाच्या गाडीमध्ये क्रुरतेने भरुन त्यांची बेकायदेशीर वाहतुक करीत असताना मिळुन आलेने वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.सदरची जनावरे गुन्ह्याचे तपासकामी जप्त करणेत आलीअसुन सदर जनावरांची चारापाण्याची सोय होणेकरीता तसेच जनावरांचे सुरक्षिततेकडील वरील नमुद जनावरे आपलेकडील गोशाळेत जमा करुन घेणेस विनंती आहे.

(पोलीस निरीक्षक शिरोळ पोलीस)

मा.सविनय सादर
ता.19/06/2026

(सही)
एस.बी.बंडगर
श्रेणी पोलीस उपनिरीक्षक
शिरोळ पोलीस ठाणे

आज दि २०।६।२६ रोजी ४ मोठे खिल्लार बैल व १ खिल्लार खोंड अशी एकुण ५ जनावरे अशक्त अवस्थेत गोशाळेत जमा करणेत आली आहेत.

(सही) Gaikwad
सयाजीराव गायकवाड